इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४१२४ (८८३)

ग्रंथ नाम माधवरावांकरितां लिहिलेली बखर

विषय म० गद्य.

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

४
३

सवाई माधवराव यांजकरितां

वि. का. राजवाडे लिहिलेली बखर

(छापलेली, खंड ४ था)

१४ वे १२२

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगजानन प्रसन्न.

श्रीमंत महाराज राजश्री राव साहेब
पंत प्रधान मुकाम शहर पुणें स्वामीचे सेवेसीं.

विनंति सेवक गंगाधर गणेश ~~व~~ जगन्नाथ गणेश दिमत सरदे-
शमुख सरकार विज्ञापना ऐसीजे श्री[मस]शिवाजी महाराज या-
णीं महाराष्ट्र राज्याचे ~~वृद्धि~~ विषयी श्रम साहस करून [राज्य]वृद्धि
फार केली ती विस्तारें करून तुम्हीं वाकब होऊन
आज्ञा केली आहे की या महाराष्ट्र राज्य[चे] साधन केल्यावरून
येणें प्रमाणें मालोजी पाटील भोसले मोजे हिंगणी ऊलगांव
वगैरे प्रांत पुणें येथून वेरूळास जाऊन राहिले ते भवानी
प्रसन्न जाहली त्याचे पोटी शहाराजे झाले त्याणीं दौलताबा-
दचे बादशाहाकडे जाऊन रोजगार करीत होते. पादशाही
चीमुलें लहान त्यांस वर्तमान मसलतीस [आपण] माडीवर बसोन दर
बार करील राव वगैरे मनसफदार मातबर खालीं उभेरा-
हून म त्यांस शिवाजी राजे मसलतीस बसूं लागले

जाधवराव याणीं आणविली ~~[illegible]~~ त्या फौजे-
चा पेंच पडला तेव्हां शाहाजी राजे याणीं पादशाहीचीं मुलें घे-
ऊन कोंकणांत माहुली किल्यावर गेले तेथें फौज नेऊन वेढा घा

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(2)

73

तला तेसमईरात्रीसमोरचेमारून आपण व बायको घेऊन
गेले पाठीवर जाधवराव व फौज लागली तेव्हां बायकोस टाकु
न बायको निर्वाळ जिजाऊ जाधवराव याची लेक त्याणीं राऊत देऊ
न शिवनेरी किला शाहजीराजे यांजकडे होता तेथें पोंच
विली लोगरोदर होती तीणें पुत्र [illegible] हालीवर तुझें नांव
ठेविले असें बोलुन नवस किल्यावर शिवाईभवानीस के-
ला. पुढें कांहीं दिवसीं पुत्र जाहला नांव शिवाजी ठेविलें.
शाहाजीराजे विजापुरास जाऊन तेथें जाहागिर मनसब
मेळऊन कर्नाटकांत जाऊन चंदी चंदावर घेऊन तीं सं
स्थानें आपलीं करोन तेथें दुसरी बायको तुकाऊ तिचे पुत्रा
चें नांव वेंकाजी राजे ठेविलें शाहाजी राजे मोंगलाईतच होते
त्यास मोंगलानें हिंदुधर्माचा उछेद करून म्लेंछमेय करावें.
या दुर्वृत्तीस प्रवर्तला तें देवास न साहावें येवनाचें पारिपत्य
करावें हिंदुधर्म स्थापावा याजकरितां शिवाजी महाराज या-
जवर श्रीची कृपा होऊन सात वर्षांचें वय लहान तेव्हांपासून
मोठीं मोठीं अमानुषी कर्मै करून राज्य उत्क्रमिलें म्लेंछा-
दि शत्रु पादाक्रांत करून धर्मक्षेत्रादि महास्थानें
पूजा ब्राह्मणापासून ब्रह्मकर्मयोगादि

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

करून श्रीरामेश्वरापासून गोदातीर पर्यंत धर्मस्थापना केली सयाद्री पर्वतावर कीले व समुद्रांतील बेटें व जंजीरे बांधून व फौज व पागा व इशाम चाकर ठेऊन राज्य वृद्धि केली मोठे मोठे बलाढ्य विजापुराहून चालून आले त्यांची पारिपत्यें करून महाराष्ट्र राज्याची अभिवृद्धि पावऊन निर्वैर केलें त्याकाळीं चित्तांत आणिले कीं सर्व शत्रु पराभव जाहाले आपल्या जवळ द्रव्य संग्रह व मुलुख व कीले कोट व पागा व फौज व हात्ती व सरकारकून व सरदार पराक्रमी राज्य संरक्षण करणार असे आहेत यउपरी आपण सिंहासनाधिश्वकरत्व करावें हा संकल्प करून चवेचाळीस वर्षीचें वय झालें नंतर कीले रायगडावरी शालीवाहन शके पंधराशें पंच्याणव नंदन नामसंवत्सरीं ज्येष्ठ शुध्ध त्रयोदशीस यथा शास्त्रोक्त सर्वां समोर थोर थोर सिष्ट ब्राह्मण आणोन राज्याभिषेक करून सिंहासनाधिप होते झाले अष्टप्रधान जे ज्या पदास योग्य आणि स्वामीशेवेचा कार्यकारणे ते पाहून योजिले ४ सिंहासनावरूढ जाहल्यावर सातवर्षे पर्यंत धर्मरितीनें राज्य पालण करीत जाले. महाराजांस दोघे पुत्र वडील श्रीमंत महाराज संभाजी राजे महाराजावर रागें

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

होऊन कीले पन्हाळीयास गेले शाके राजाराम साहेब जवळ होते
त्याजवर महाराजांस व्येथा होऊन अत्यावस्थ झाले ते समई
सर्व कारकूनानि विचार केला कीं संभाजीराजे उग्र आहेत
राजाराम शांतस्वरूप यास राज्यास नीबसऊन राज्य करा
वें असा सिद्धांत करून महाराजांस व्येथा जाल्याची बातमी
संभाजीराजे यांस न कळे असा बंदोबस्त केला असतां त्या
स वर्तमान कळतांच निघोन रायगडास आले त्यास शके १६०२
रौद्र नाम संवत्सरीं चैत्र शुद्ध पौर्णिमेस दोन प्रहरीं कैलासवा
स माहाराजानी केला. सर्व कारकून याणि विच्यार केला हो
ता तो संभाजीराजे यांस कळला तेव्हां सर्व कारकूनानि पारि
पत्यें करून राज्य करीत होते त्या समई औरंगजेब पातशा
हा दक्षिणेस होते विजापुरकर वगैरे पादशाहा आदि करुन
त्यानंतर संभाजी माहाराज यांस धरून न्यावे या प्रयत्नां
त होते उपाय न चाले ते समई कबजी कन्योज्या ब्राह्मण
मातबर होता त्याणें धरावयाची मसलत कबुल करून मा-
हाराजाजवळ आला त्यांस वसिकर्ण करून माहाराजां
स मोहित केलें आणि सर्व कारभार कबजीच करा(ला)लाग
ले संभाजीराजे याणिं राजाराम यास पन्हाळयास नेऊन

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

संभाजीराजे स्वारीस फिरूं लागले ते समई कबजीनें पाले
शाई फौज आणविली त्या फौजे वर संभाजीराजे चालुन
गेले आणि लढाई झाली युध्धप्रसंग होला आणि मोडिले
तेव्हां राजे कोकणांत गेले मागें फौजा लागल्या संभाजी माहा
राज व त्यांचे पुत्र श्रीमंत शाहू राजे यांस संगमेश्वरीहून
औरंगजब पातशाहा तुळापुरास होते त्यांजजवळ नेले आ
सलांमुजरा न केला संभाजीराजे खुब सुरद फारच होते
त्यांस बाटवावें असें मनांत आणिलें आणि त्यास बाटवावें
असें सागून पाठविलें तेव्हां संभाजीराजे याणिं सांगून
पाठविलें तुमची बेटी बेगम [illegible] ती घतल तर बाटलो त्यास
त्या रागानिमित्त संभाजी राजे यांचा शिरच्छेद करावया
चा हुकूम केला हें वर्तमान बेगमेस कळतांच अर्ज करावं
यास गेली तो शिरच्छेद केला त्याजवर बेगमेस दादला
करावयाविषयीं विच्यारलें ते समई बोलली कीं संभाजी
नें मजला बायको करतों असें म्हटल्यास्तव आपल्यास
भ्रतार करणें नाहिं म्हणोन तसीच राहिली शाहू राजे बाद
शाई लष्करांत होते इकडे रामराजे राज्य करीत होते त्या
स संभाजीराजे मारिल्यावर औरंगज्यब पातशाहा

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

गड किल्याचा बंदोबस्त करीत चा-
लीले ते समई रामराजे व त्याच्या स्त्रिया ताराबाई वगैरे
राजसबाई पन्हाळा किल्यावर सरकारकून सुध्धां होती
त्यास पन्हाळा किला मोरचे लाऊन घेतला यास्तव पन्हा
ळ्याहून रायगडास गेली तेथून चंदीस कर्नाटकांत स्त्रि
या सरकार सुध्धां ने घेऊन गेल्याचें वर्तमान पातशाहास
कळलांच असदखान वजीर याचे पुत्र झुलपुकारखान
यास फौजे सुध्धां चंदीस पाठविले त्यांणीं चंदीस जाऊन
वेढा घातला ते समई संताजी घोरपडे फौज सुध्धां बाहेर
राहून मोंगलाशीं युध्ध करीत परंतु मोंगल पुढें ~~इलाज~~
उपायेनाहीं चंदीही जेर होत चालली त्या समयांत संता
जी घोरपडे याणिं महा प्रेत्नें करून तजवीजी रामराजे
यांस काढून वेरुळास पोंचविले तेथून पन्हाळ्यास आले
बायकोस गणोजी शिरके मागें मोंगलाई चाकर याणी
आपल्या बहिणी राजे याच्या स्त्रिया असें मानून झुलपु
कारखान यास सांगून पन्हाळ्यास पोंचविल्या सरका
रकून चंदीस मागें राहिले ते सांपडले त्याणिं पैका दंड देऊ
न सुटुन आले त्या दिवसा पासून संताजी घोरपडे यास

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

हिंदुराई व सेनापति पद दिलें राजाराम राज्य करीत होते
ते वेळेस संताजी घोरपडेही होते ते समई बोलीले की
मी हालों म्हणून राज्य वांचलें त्यास सेवधर्म करून दाख
विला तो माहाराजांचे चित्तांत होताच परंतु त्याणीं सम
क्ष बोलून दाखविले तेव्हा माहाराजांचे चित्तांत विषम
वाटलें ते संताजी घोरपडे यासही समजलें तेव्हां तेथें
चाकरी करून राहाणें वाईट असें समजून घोरपडया
जवळ चावीस पन्नास हजार फौज उठून सतांउदनच्या
ठले ते समई फौज सरकारची सारी राहिली पंचवी
स राउतानिशी जात होते यास घोरपडयांचा शिलेदार
म्हसवडकर जीवे मारिला होता त्याचे घरीं अकस्मात
गेले त्यास उमजलें नव्हते परंतु त्या शिलेदार याचे बा
यकोस नांव कळलांच धरून भोजनास चांगले
करून घातलें आणि वाटेंत मारेकरी घालोन आपल्या ले
दादल्याचा सूड घेऊन मारिलें त्याजवर सेनापतिपद
धनाजी जाधवराव यास दिलें रामराजे पन्हाळयाकि-
ल्यावर राज्य करीत होते यास औरंगज्येब पातशाहाचे
वडील पुत्र दिलीस होते व धाकटे पुत्र आजमशाहा जवळ

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

होते त्यास औरंगजेब दक्षिणेस वारले तेव्हां अजमशाहा
बाहादुरशाहा वर चढाई करून दिलीस चालीले राजाराम
गडकिल्याच्या बंदोबस्त करावयाविशीं आले होते ते सिं-
हगडास कैलासवासी जाले पांच साल वर्षें राज्य केलें
त्याचे मागें त्याची स्त्री ताराबाई सरकारकूनास हवले
मान राज्य करीत होती शाहू राजे यांस अजमशाहानीं
बराबर नेलें त्यास अजमशाहास झुलफुकारखानानीं
सल्ला दिला कीं राज्य [illegible] आहे ते बाजकरितां शाहू
राजे आपले म्हणोन निरोप द्यावा असें सांगितलें व
बेगमही माहाराज्यावर कृपा करीत होती ते समई मा
हाराजांस आदर बहुमान करून भाक घ्याहून निरोप
दिला अजमशाहा मजल दर मजल दिलीस चालिले औ
रंगजेब दक्षिणेंस आसतां त्याजवळ अमीरउमराव व
तोफखाना अजमशाहाबरोबर
होतीच व बाहादुरशाहा दिलीचे तख्तावर बसून पाद
शाहीत करूं लागले तिकडे अमीरउमराव व थोर थोर
होते ते त्यास सामील जाले सात आठशें तोफांचीतया
री केली व फौज जमा करून दिली बाहेर निघोन

"Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

आले त्यास बाहादुरशाहा औरंगजेबपातशाहाचा वडील पुत्र
पातशाईस तो योग्य व अमीर व खजीना स्वाधीन त्याचे
लागले दिली त्याणी कामिली अजमशाहाबरोबर फौज
भारी होती लढाई मालवर होऊन घाय पडला तेव्हां अज
मशाहाबराबरचे अमीर उमराव बाहादुरशाहास जा
ऊन भेटले श्रीमंत शाहू माहाराज माळवपाहून दरम-
जल रवाना देशात आले तेथे चिमणाजी दामोदर व
परसोजी भोसले भेटले त्याचे विचारे मनसलक करून
फौज जमा करीत करीत गंगातिरास आले तेथें
आठ पंधरा दिवस मुकाम करून गंगा उतरून पुढें
आले फौज रोजचे रोज नवी येत दरमजल आले
हें वर्तमान ताराबाईस समजले तेव्हां त्याणी बातमीदा
र पाठऊन बातमी आणिली त्यास शाहू राजे याचे
ठाईस केवळ जोगी गोसावी तोतया आहे असें राज्य
लोभाचें अर्थे बोलोन धनाजी जाधवराव यासी चाकी
स पन्नास हजार फौजेनशीं शाहू राजे याजवर पाठ
विले तेही दरमजल भिमातिरीं खेडास आले तेथें शा
हू माहाराज याची व जाधवराव याची गांठ पडोन युध्ध

"Joint project of the Rajwade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

प्रसंग पडला आथवयास मोडिले तेव्हां कीलीकांची राज
कारणे मागोन माहाराज्यांस भेटले आथवरावही घोड्या
वरून उतरून कुरनुस करोन रुजु जाहाले माहारा
ज दरमजल दहिंगावांस येऊन चंदन वंदन किल्याचे
राजकारण करून किले सर केले ते समई परशराम
पंत याणी सातारेचा किला बळकाविला सातारियावर
शेखमिरा होते त्याणीं परशरामपंतास किलेक गोष्टी
माहाराजास भेटावया न्या सांगितल्या असतां त्याचे
विचारास न आले शेखमिराजवळ पांचशें माणूस होते
परशरामपंतास यांजन करीत ठेवेकी धरिले तेव्हां कि-
ल्यावर गडबड होऊन तरवारी चकमकु लागल्या त्या चंदन
वंदनाहून पारलांच माहाराजानीं स्वारी करून किल्यावर
गेले किला हस्तगत जाहाल्यावर परशरामपंत याचे डोके
काढील होते ते वर्तमान खंडोबा काकयासीं कळतांच
धाऊन जाऊन सच्छ रदबदली केली आणि वांचविले ते
समई पायांत बेडी घातली त्याजवर कृष्णराव खटावकर
भोगलाई मनसफदार होते ते फौजसुध्धां सातारियास
चालून आले असतां महाराज फौजसुध्धां त्यावर गेले

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

लढाई होऊन गेली ते वेळेस परशरामपंत याणीं आपले पुत्र श्रीप-
तराव याणीं जीवीताकडे न पाहतां सफजंगीची लढाई करून
कृष्णराव खटावकर यासी मोडून दस्त केला संध्याकाळीं
महाराज सातारियास येतां परशरामपंताची बेडी तोडून
परमकृपावंत महाराज जाहाले बाळाजीपंत नाना व धना-
जी जाधवराव यांसपाशीं बावलीचा रोजगार करीत होते
जाधवराव याचा व नाना याचा पेच पडला याजमुळें आगो
धर माहाराजांस जाऊन भेटले माहाराज साताऱ्यास श
के १६३९ संवत्सरीं दाखल जाले राज्याचा बंदोबस्त करून
सरकारकूनांस पदें वस्त्रें वहुमान यथायोग्य तेनें रूप
तपसील वार येणें प्रमाणें

अष्टप्रधान

१ सेनापति धनाजी जाधवराव
१ प्रधानपद बहिरोपंत पिंगळे
१ अमात्य बाबुराव यासी
१ सुरनिशी नारो शंकर
१ मंत्री नारो राम शेणवी
१ सुमंत आनंदराव

१ सेनापति बाळाजीपंत नाना यासी
१ सदाशिवपंताकडे सिंहिगड व पुरंदर व पुणें सुभाव साहोत्राकुल दिल्हा

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

१ न्यायाधीश होनाजी अनंत
१ पंडीतराई मुद्गल भटजी
/८

१ पंत प्रधान याजकडे
राजमाची वगैरे किल्ले
१ परशरामपंत प्रतिनि
धि यासि पूर्वील प्रो.
पद शाहू माहाराजयां-
णी दिल्हें

९ — ८ घाट

गंगाधर भट यासी प्रतिनिधि राजाराम
साहेब याणी दिल्ही होती नंतर परशराम
पंत यासी दिल्ही.

तारा बाईचा वसवसा याजमुळे महाराजास पंगतीस
घेऊन भोज्यन करावयाचा मराठे अनुमान करीत
परंतु परसोजी भोंसले म्हणू लागले कीं संभाजी महा
राजाचे पुत्र व आम्हीं येका जागा भोज्यन करीतो ते
व्हां परसोजी भोंसले व धनाजी जाधवराव वगैरे मरा
ठे मिळोन महाराज येके पंगतीस भोज्यन करूं लाग
ले तेव्हां परसोजी भोंसले यांजवर कृपा करून सेना

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

साहेब सुभा रें पद नूतन उपस्थित करून वस्त्रें बहुमा
न प्रसाद पुर्वक देऊन पदहि दिल्हें ते समई सिधोजी
गुजर याजवळ सुवर्णदुर्गास कोनोजी आंगरे चाक
र होते सिधोजी गुजर राजाराम साहेब यांचे बरो
बर चंदीस गेले होते कानोजी आंगरे याणीं मर्दुमी
नें सुवर्णदुर्ग बळाऊन तेथून विजयदुर्ग वगैरे किले
घेतले ते समई राजाराम साहेबीं सरखेलीचें पद दि
ल्हे त्याउपर तेथून येऊन कुलाबा खांदेरी सागरगड
घेतले तारा बाईचा व शाहू महाराजाचा पेंच होता
याजमूळें कान्होजी आंगरे याणीं महाराज शाहू
राजे यांच्या राज्यांतील किले लोहागड राजमा
ची व दुर्ग तिकोना व थुनगड हे किले घेतले व लो
होगडाहून बहिरोपंत पिंगळे यासी आंगरे याणीं
धरून नेले याउपरी कान्होजी आंगरे सातार्या पावेतों
येतो महाराज्या जवळ द्रव्याचें बळ नाहीं कान्होजी आं
गरे याणीं दरयांत बंडावेक करून खजिना मेळविला व
जालीनें मर्द जेव्हां महाराजांस विच्यार पडला कीं बहि
रोपंतास धरून नेलें राज्याचा बंदोबस्त जाहाला पाहि

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

जे पिंगळे नाकर्ते ते समई परशराम पंतास तुम्ही करून
राज्याचा बंदोबस्त कर्णे किले आंगरे याणीं घेतले त्याचे
पारिपत्य करून किले घेणें म्हणोन अज्ञा केली त्यास परशरा
मपंत याणीं विनंति केली कीं बाळाजी विश्वनाथ याज
कडे फौजेचे वळण आहे त्यास पेशवाईची वस्त्रें द्यावी
ते बंदोबस्त करतील तेव्हां खंडो बल्लाळ चिटणीस यांस
ही माहाराजांनी विच्यार पुसोन बाळाजीपंत नाना
यासी आज्ञा केली त्याणी मान्य केले आणि तीन
च्यार हजार फौज जमा करून दरमजल लोहोगडा खा
लीं गेले बाळाजीपंत नानांचा व आंगरे याचा काग
दो पत्रीं घरोबा होता आंगरे यासी पत्र लिहून पाठवि
लें आणि ~~स्वार~~ दरमजल कुलाबीयासी गेले सरखेल सा
मोरे येऊन भेटीचा समारंभ जाहाला उपरांत खलबता
स बसून त्यास सांगितले कीं तुमचा आमचा भाऊपणा
पेशवाई तुमचे घरांत येत किले घेत आसाल तरी त
सेंच सांगावें शिक्के कट्यार वस्त्रें त्यास दाखविली व त्यास
विचार सांगितला कीं सरखेलीचें पद ताराबाई कडून
आहेच व इकडूनही करार करून देवविलों महाराज्याचे

" Joint project of the Rajwade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

चाकर होऊन कृपा संपादुन घ्यावी त्याजवरून त्याणी
मान्य करून राजमाची मात्र येऊन लोहगड व धनगड
व जुंगलि कोना ऱ्या कि ल्याच्या चिट्या देऊन किले देव
विले जंजीरकर हापशाच्या व आंगरे याचा कलह होता
तो तह करून दिल्हा बहिरोपंत पिंगळे यासी धरून
नेले होते त्यासी सोडऊन समागमे घेऊन आले माहा
राज्याचे लोक किल्यावर महाराज्याचे दर्शन जाहाले
कान्होजी आंगरे यासी सरखेलीचे पद व करार करून
वस्त्रे शिक्के कट्यार त्यास पाठविलीं व दमाजी थोरात हिंग
णगांवकर पुंडावे करीत होता त्यासी शंकराजी मल्हार
सदे व सुभेदार यांचे दिवाण ताजकडून फौजा नानो
नीं आणउन दमाजी थोरात याचे पारिपत्य करून त्या
चा सरंजाम होता तो हुजुरालिकडे ठेविला नारो
शंकर सचीव यासी     रानी धरून नेले होते त्यास
सोडविले ते समई नारो शंकर याची मातोश्री
येसुबाईनीं किला पुरंधर व पुणें सुभा व जुन्नर
सुभा स्वराज्याचा अम्मल सचीवाकडे होता तो
नानाकडे दिला त्याकाळीं दक्षिणेस प्रांत शाहाकडून

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

सदे व सुभेदार साहा सुभ्याचे होते त्याचे व फाराकशा-
हा पातशाहा याचे चित्त शुद्ध नव्हते पातशाहावर
स्वारीस सेख व सुभेदार जाऊं लागले ते समई शाहू
महाराजांस ~~कुच~~ जवळ कुमकेस फौज मागितली
दररोज पन्नास हजार रुपये द्यावयाचा करार केला
तेव्हां महाराजानीं नानास जावयाची आज्ञा केली
फौज व सरदार बरोबर दिले फौज सह वर्तमान
सैदव याजजवळ पोहचले सैदव मजल दर मजल
दिलीस जाऊन पातशाही फौजेस जरब देऊन नारो
मशाहा पातशाहास धरून त्याचे नेत्रास उपाय केला
आणि त्याचे पुत्रास तक्तावर बसविला ते समई
पुणे सुभा व जुन्नर सुभा येथील मोंगलाई अम्मल
दरोबस्त व तमाम मोंगलाई अम्मलाची चवथा
ई व स्वराज्य व सरदेशमुखीचे माहारा
जांस करार करून पातशाई सनदा घेऊन आले
सदेवाकडून पन्नास हजार रुपये दररोज पावत
होते त्यापैकीं निमे फौजेस खर्च करून बाकी

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

रवजीना वाकगून सालाज्यास महाराज्यांचे दर्शनास
गेले महाराज परम कृपावंत जाले परगणे कडे रांजण
गांव वगैरे पंच महाल सरदेशमुखीचें वतन नानां
स दिलें. सईद दक्षिणेस येऊन सहासुभे याचा सु
भाकरील होते यास कांहीं ऐके दिवशी पातशाहा
नीं दिलीपरवाना यासी दक्षिणच्या सुभा सांगून
रवाना केले सैदा [blank] अवक फौज
होते दिलिपरवान यांणी दिलीहून निघाल्यावर
फौज जमा करील यांचे रीत आणि पातशाहाची
सैदावर अवकृपा आणि दिलीपरवान याजवर
[blank] करून सैदास मोडून जस्त ना
बुद केला आणि दक्षिणेचा सुभा करूं लागला व
स्वदेशी कि एक पुंडपाळेगार होते त्यांची पारि
पत्यें नानांनी केलीं त्यास प्रथम जाधवराव याजक
डे जाऊन बावलीचा सुभा करून तेथून श्रीमंत
शाहू महाराजाकडून सेनेला [blank] केलें विले
महाराजांची सेवा ऐकनिष्ठ करून मर्द व शाहणे मनुष्ये

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

राज्यांत नाना ऐसा लौकिक वाढऊन महाराजांची
कृपा संपादून प्रधान पद मिळविले जीवाविशेष श्रम करून
शत्रू पराभवून महाराजांचे राज्याचा बंदोबस्त केला
त्याजवर काहीं एक दिवशीं नाना कैलासवासी झाले
तेव्हां श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब व चिमाजी आ
प्पा सातार्‍यास महाराजांचे दर्शनास गेले राव साहेब
यांसी प्रधान पदाची वस्त्रें दिल्हीं व आपा साहेब यांसी
दमाजी थोरात यांचा सरंजाम सरकारांत होता त्या-
ची वस्त्रें सरदारी सरंजाम सुध्धां देऊन वस्त्रें दिल्हीं
सातार्‍याहून पुण्यास आले राजश्री धनाजी जाधव
राव यांचे पुत्र चंद्रसेन जाधवराव सेनापति यांजवर
महाराजांची अवकृपा झाली याजमुळे ते मोंगलाईंत
नबाब किलीजखान यांचे राज्यांत गेले तेव्हां खंडेरा
व दाभाडे यांसी सेनापति व त्यांचे पुत्र त्रिंबकराव दा
भाडे यांसी सेनाखासखेल ही दोन पदें महाराजांनी
कृपा करून दिल्हीं त्याजवर कितीएक दिवशीं खंडे-
राव दाभाडे वारले तेव्हां सेनापति त्रिंबकराव दाभा

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com